# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३३१ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### रूसवे-फुगवे

राज्यातील महापालिका महापौर आरक्षणाची सोडत काढण्यात आली. या आरक्षणात १५ महापालिकांच्या महापौरपदी महिला विराजमान होणार आहेत. नागपूर महापालिकेत देखील खुल्या प्रवर्गातील महिला महापौरपदी बसणार आहेत. भाजपने शंभरावर जागांवर बाजी मारत एकहाती सत्ता काबिज केली आहे. त्यामुळे भाजपचा महापौर बसणार हे निश्चित झाले आहे. भाजपमध्ये महापौरपदासाठी अनेक महिला इच्छुक आहेत. काही महिला नगरसेवक दोन, तीन टर्म निवडून आल्या आहेत. प्रत्येकीला वाटत आहे की, आपला नंबर लागावा. इच्छा व्यक्त करायला काही पैसे लागत नाहीत. महापौरपदी वर्णी न लागल्यास नगरसेविकांमध्ये रूसवे फुगवे सुरू होणार आहेत. इतकी वर्ष पक्षात प्रामाणिकपणे काम करून काय मिळाले असे म्हणायला देखील या महिला नगरसेविका मागेपुढे पाहणार नाही. परंतु, भाजप हा शिस्तप्रिय पक्ष म्हणून ओळखल्या जातो. वरून जो आदेश येईल त्यालाच महापौरपदी बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे इतर महिला नगरसेवकांनी इच्छा व्यक्त करूनही काहीच फायदा नाही. ज्यांचे देवाभाऊसोबत चांगले संबंध आहेत त्याला आशेचा किरण दिसत आहेत. तिकडे केंद्रीयमंत्री नितीन गडकरी हे कुणावरही अन्याय करणार नाहीत अशीही चर्चा आहेत. जुन्या जानता नगरसेवकांना गडकरी न्याय देतील अशी या नगरसेवकांना आशा आहे. तसेही भाजपमध्ये नव्यानेच आणि पहिल्यांदा निवडून आलेल्या नगरसेवक महिलेची शहरात बरीच चर्चा आहे आणि ते सत्यही आहे. या महिला नगरसेविकेच भाजपमधील वाढते बळ पाहता त्याला पुष्टी मिळते. या नगरसेविका अगदी तरूण आहेत, खालच्या पातळीवरून त्या वर आल्या आहेत. धाडसी आहेत, प्रामाणिक आहेत त्यामुळे त्यांची महापोरपदी वर्णी लागल्यास आश्चर्य वाटायला नको.

# महापौर पदासाठी आरक्षण सोडत जाहीर

## नागपूर खुला प्रवर्ग (महिला), चंद्रपूर ओबीसी (महिला)

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२**

राज्यातील २९ महापालिकांमधील महापौरपदाच्या आरक्षणाची बहुप्रतिष्ठित सोडत अखेर जाहीर करण्यात आली. या सोडतीत नागपूर महापालिकेत खुल्या प्रवर्गातून महिला, तर चंद्रपूर महापालिकेत ओबीसी प्रवर्गातून महिला उमेदवार महापौरपदी विराजमान होणार आहेत. या आरक्षण सोडतीवर काही पक्षांनी आक्षेप घेतला असून सत्ताधारी पक्षांना सोयीचे व्हावे असे आरक्षण सोडत काढण्यात आली असा आरोप विरोधकांनी केला आहे.

महापौर आरक्षण पदाच्या सोडतीकडे सर्वच पक्षांच्या नेत्यांचे लक्ष लागून होते. सर्वात जास्त मुंबईकडे लागले होते. सोडतीत मुंबई महापालिकेवर खुल्या प्रवर्गातील महिला महापौर होणार आहेत. राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत भाजप अनेक ठिकाणी सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी स्पष्ट बहुमत नसल्याने अनेक शहरात मित्रपक्षांचा किंवा प्रसंगी विरोधकांचा पाठिंबा घेण्याची वेळ आली आहे. राज्यात एकत्र सत्तेत असलेले पक्षही स्थानिक पातळीवर ऐकमेकांविरोधात उभे ठाकलेले दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर महापौर आरक्षणाची




सोडत ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया न राहता राजकीय गेमचेंजर ठरली आहे.

मुंबईत महापौरपद खुल्या प्रवर्गात राखीव ठरल्याने सर्व प्रमथळ राजकीय पक्षांना नव्या महिला नेतृत्वाचा चेहरा पुढे आणण्याचे आव्हान उभे राहिले आहे. सत्ता स्थापनेसाठी आवश्यक संख्याबख जमवत असतानाच योग्य महिला उमेदवार, जाती समीकरण, पक्षांतर्गत सहमती या सगळ्यांची कसरत आता निर्णायक ठरणार आहे. मुंबई पालिकेचा कारभार प्रचंड अर्थसंकल्प आणि शहरी धोरणांवरील प्रभाव पाहता हा निर्णय राज्यस्तरीय राजकारणावरही परिणामकारक ठरण्याची शक्यता आहे.

गुरूवारी दुपारी १२ वाजता या सोडतीला सुरुवात झाली. नगरविकास राज्यमंत्री माधुरी पिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढण्यात आली. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत राहणार आहे. यावेळी नगरविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज उपस्थित होते. सर्वप्रथम कल्याण-डोंबीवली महापालिकेची सोडत काढण्यात आली. या महापालिकेत अनुसूचित जमातीचा उमेदवार महापौर राहणार आहे.

मुंबईसह नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबईसारख्या आर्थिक व औद्योगिक केंद्रात महिला महापौर येणार असल्याने स्थानिक धोरणे, नागरी सुविधा, शहरी विकास कामांना प्राधान्य यावर महिला महापौरांचा प्रभाव दिसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आरक्षण सोडत जाहीर झाली असली तरी खरी कसोटी आता सत्तास्थापनेच्या गणिताची आणि मुंबईतील महिला नेतृत्वाच्या निवडीची आहे. प्रत्यके महापालिकांचा महापौर हा राज्याच्या राजाकारणांची दिशा ठरविणारा ठरणार आहे.

### येथे राहतील महिला महापौर

१) जालना : अनुसूचित जाती (महिला)
२) लातूर : अनुसूचित जाती (महिला)
३) चंद्रपूर : ओबीसी (महिला)
४) जळगाव : ओबीसी (महिला)
५) अकोला : ओबीसी (महिला)
६) अहिल्यानगर : ओबीसी (महिला)
७) मुंबई : खुला प्रवर्ग (महिला)
८) नवी मुंबई : खुला प्रवर्ग (महिला)
९) पुणे : खुला प्रवर्ग (महिला)
१०) पिंपरी-चिंचवड खुला (महिला)
११) भिवंडी : खुला प्रवर्ग (महिला)
१२) नाशिक : खुला प्रवर्ग (महिला)
१३) नागपूर : खुला प्रवर्ग (महिला)
१४) धुळे : खुला प्रवर्ग (महिला)
१५) नांदेड : खुला प्रवर्ग (महिला)

### सर्वसाधारण आरक्षण

१) कल्याण-डोंबीवली अनुसूचित जमाती
२) ठाणे : अनुसूचित जाती (सर्वसाधारण)
३) पनवेल : ओबीसी सर्वसाधारण
४) इचलकरंजी : ओबीसी सर्वसाधारण
५) मिरा-भाईंदर खुला प्रवर्ग
६) सांगली : खुला प्रवर्ग
७) सोलापूर : खुला प्रवर्ग
८) संभाजीनगर : खुला प्रवर्ग
९) परभणी : खुला प्रवर्ग
१०) मालेगाव : खुला प्रवर्ग
११) अमरावती : खुला प्रवर्ग
१२) कोल्हापूर : ओबीसी सर्वसाधारण
१३) वसई-विरार खुला प्रवर्ग
१४) उल्हासनगर : ओबीसी सर्वसाधारण

### नागपुरात महापौर कोण ?

महापौरपदाची सोडत जाहीर झाल्यानंतर आता नागपुरात महापौर कोण ? अशी चर्चा सुरू झाली आहे. तसेही यंदाच्या निवडणुकीत भाजपने १०१ जागांवर विजय मिळवित एकहाती सत्ता काबिज केली आहे. महापौरपदाच्या शर्यतीत शिवानी दानी, दिव्या धुरडे, अश्विनी जिचकार, विशाखा मोहोड, नीता ठाकरे हे दावेदार आहेत. धुरडे, अश्विनी जिचकार या यापूर्वी महापौरपदी होत्या. त्यामुळे त्यांचे नाव मागे पडू शकते. मात्र, धुरडे, मोहोड आणि ठाकरे या दुसऱ्यांदा निवडून आल्या. त्यामुळे त्यांनीही महापौरपदावर दावा ठोकला आहे. मात्र, भाजप नेत्यांच्या माहितीनुसार, महापौरपदाची माळ शिवानी दानी यांच्याकडे जात असल्याची चर्चा आहे. दानी या पहिल्यांदाच महापालिकेत गेल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून त्या भाजपमध्ये सक्रिय आहेत. त्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांचे चांगले संबंध असल्याने महापौरपदी शिवानी दानी यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

## तृतीयपंथीयांसाठी हेल्पलाईन क्रमांक

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२**

तृतीयपंथीय हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असुन, या घटकास समाजाकडुन सापत्न व भेदभावाची वागणुक दिली जाते. नेहमीच भेदभाव व सापत्न वागणुकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासुन दुर्लक्षित राहीलेला आहे.

त्यामुळे या समाज घटकाचे शासनामार्फत मुलभुत अधिकाराचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे करिता तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ व नियम २०२० संपुर्ण देशात लागु झालेला आहे. तृतीयपंथीयांच्या समस्या सोडविणे करिता त्यांची ओळख निश्चित करणे करिता केंद्र शासनाने नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर हे संकेतस्थळ उपलब्ध करुन दिले आहे.

तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींना आकस्मिक परिस्थितीत मदत मिळावी तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे या करिता नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर या पोर्टलवर नॅशनल हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करुन दिलेला आहे.

तृतीयपंथीय समुदायातील व्यक्तींनी त्यांच्या तक्रारी व समस्यांच्या निराकरणासाठी तसेच आकस्मिक स्थितीत मदत मिळण्यासाठी तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

## कल्याण-डोंबिवली सत्तासंघर्षाला नवे वळण

### चार नगरसेवकांना डांबून ठेवले शिवसेना (उबाठा) पक्षाचा आरोप

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२**

कल्याणडोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणूक निकालानंतर स्थानिक राजकारणात अस्थिरता वाढत असतानाच, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने एक गंभीर आरोप करत राजकीय वातावरण अधिक तापवले आहे. निवडणुकीत विजयी झालेले पक्षाचे चार नगरसेवक निवडून आल्यापासून गायब असल्याचा दावा करत, त्यांना जबरदस्तीने रोखून ठेवण्यात आल्याची धक्कादायक माहिती पक्षाने समोर आणली आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कल्याणडोंबिवली जिल्हाध्यक्ष अल्पेश भोईर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत थेट आरोप केला की, संबंधित चार नगरसेवक सध्या शिवसेना शिंदे गट तसेच मनसे शी संबंधित काही व्यक्तींच्या ताब्यात आहेत. "जर आजच या नगरसेवकांना प्रसारमाध्यमांसमोर आणून त्यांची मुक्तपणे भूमिका मांडू दिली नाही, तर आम्ही पोलीस ठाण्यात 'मिसिंग'ची तक्रार दाखल करू," असा इशाराही त्यांनी दिला.

अल्पेश भोईर यांनी सांगितले की, "हे चारही नगरसेवक आमच्या सातत्याने संपर्कात आहेत. ते स्वतः आमच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असून, आपल्याला इच्छेविरुद्ध एका ठिकाणी रोखून ठेवण्यात आले आहे, अशी व्यथा ते व्यक्त करत आहेत." त्यांच्या म्हणण्यानुसार, या नगरसेवकांनी स्पष्टपणे कळवले आहे की शिंदे गट किंवा मनसेसोबत कोणताही राजकीय करार, अलायन्स किंवा पाठिंबा देण्याची त्यांची इच्छा नाही.

# दावोसमध्ये आणखी १० लाख कोटींचे करार : फडणवीस

**दावोस, दि. २२**




दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे.

महाराष्ट्रातील पत्रकारांशी त्यांनी व्हीसीच्या माध्यमातून आज संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. या करारांमध्ये ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे. या १८ देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, जपान, स्वित्झर्लंड, स्वीडन, नेदरलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, युएई, स्पेन, कॅनडा, बेल्जियम इत्यादींचा समावेश आहे. औद्योगिक, सेवा, कृषी, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक येते आहे. सामंजस्य करार प्रत्यक्षात परावर्तित होण्याचा दर हा ७५ टक्के आहे. गेल्यावर्षीचे करार हे ७५ टक्के प्रत्यक्षात आलेले आहेत, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

ही गुंतवणूक ३ ते ७ वर्षांत परावर्तित होत असते, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एसबीजी, ब्रुकफिल्ड, आर्सेलर मित्तल, फिनमन ग्लोबल, इस्सार, स्कोडा ऑटो, फॉक्सवेगन, एसटीटी टेलिमीडिया, टाटा, अदानी, रिलायन्स, जेबीएल, कोकाकोला, बॉश, कॅपिटल लँड, आयर्न माऊंटेन अशा अनेक कंपन्यांशी हे करार झालेले आहेत. काही समूह हे भारतीय असले तरी त्यांच्या सुमारे १६५ देशांमध्ये गुंतवणूक आहे. क्वांटम कम्प्युटिंग, एआय, जीसीसी, डेटा सेंटर्स, आरोग्य, अन्न प्रक्रिया, ग्रीन स्टील, नगरविकास, जहाजनिर्माण, फिनटेक, लॉजिस्टीक, डिजिटल इन्फ्रा अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक आली आहे.

### सर्वदूर गुंतवणूक

कोकण, एमएमआरमध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, ५० टक्के राज्याच्या इतर भागात आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर अशा सर्व भागात ५० हजार कोटी, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५,००० कोटी रुपये, कोकण प्रदेशात ३,५०,००० कोटी, नागपूर आणि विदर्भात २,७०,००० कोटी अशी प्रमुख आकडेवारी आहे. जायका, जेबीआयसी, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, स्टॅंडफोर्ड युनिव्हर्सिटीतील स्टॅंडफोर्ड बायोडिझाईन असे अनेक संस्थात्मक करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

### देशातील पहिली इनोव्हेशन सिटी

टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करणार आहोत, येणाऱ्या ६ ते ८ महिन्यात याचे सविस्तर नियोजन होईल. ही संकल्पना गेल्याचवर्षी दावोसमध्ये आली होती. टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत याबाबत चर्चा झाली. यासाठी १ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक टाटा करणार आहेत. इतरही अनेक देशातील गुंतवणूकदार यासाठी गुंतवणूक करणार आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमीचा विकास!

मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करणार असून मुंबईतील पाणी, हवा याचे प्रश्न यातून सोडविण्यात येतील. सर्व प्रकारच्या वेस्टवर प्रक्रिया झाली पाहिजे, हा प्रयत्न यातून करण्यात येणार आहे. पुढे हीच संकल्पना सर्व मोठ्या शहरांमध्ये नेण्यात येईल. मुंबईत पुढच्या २ ते ३ वर्षात हा परिणाम आपण दाखवू शकू. रायगड-पेण्ग्रोथ सेंटरची घोषणा याच दावोसमध्ये करण्यात आली. या ग्रोथ सेंटरमुळे एक बिझनेस डिस्ट्रीक्ट तयार होईल. यात १ लाख कोटींची गुंतवणूक कालच आली आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## महापौरपदाच्या लॉटरीवर ठाकरे गटाचा आरोप

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२**



महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाची आरक्षण सोडत आज काढण्यात आली. या सोडतीवर आता शिवसेनेकडून (ठाकरे) आक्षेप घेण्यात आला आहे. शिवसेनेच्या (ठाकरे) माजी महापौर आणि विद्यमान गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी या लॉटरी (सोडत) प्रक्रियेवर आक्षेप घेतला असून त्याचा धिक्कार केला आहे.

सोडतीनंतर माध्यमांशी बोलत असताना किशोरी पेडणेकर म्हणाल्या, "मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणासाठी महिला ओबीसी प्रवर्गाची चिठ्ठी टाकलेली नाही. २०१७ आणि २०२२ साली महापौरपदाचे आरक्षण खुल्या गटाचे होते. आतापर्यंत महिला ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण पडलेले नाही. हा ओबीसींवर अन्याय आहे."

"निवडणूक व्हायच्या आधी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी किती ठिकाणी आरक्षण असायला हवे, हा नियम बनवायला हवा होता. मात्र निवडणुकीनंतर आता अनुसूचित जमातीचे तीन किंवा त्यापेक्षा अधिक नगरसेवक असतील तरच आरक्षण असले पाहिजे, असा नियम बनवण्यात आला आहे. हे जाणूनबुजून केलेले आहे. मुंबई महानगरपालिकेत अनुसूचित जमातीमधून दोन नगरसेवक निवडून आले असून ते शिवसेनेचे (ठाकरे) आहेत. याचा अर्थ लॉटरी ठरवून केलेली आहे. या लॉटरी आणि निवडणूक प्रक्रियेचा आम्ही निषेध करतो", असेही किशोरी पेडणेकर म्हणाल्या.

किशोरी पेडणेकर यांनी पुढे आरोप केला की, सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ पाहून सोडत काढण्यात आलेली आहे. सत्ताधाऱ्यांनी ओबीसी, अनुसूचित जाती आणि जमातींवर अन्याय केला आहे. निवडणुकीआधी आरक्षण ठरवायला हवे होते. पण आता सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ पाहून ठरविण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेत एसटी प्रवर्गाचे दोन नगरसेवक आहेत, म्हणून त्यांना न्याय द्यायचा नाही का?

## निवृत्तीनंतरही चहल यांच्या खांद्यावर नवी मोठी जबाबदारी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२**



महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळातील अनुभवी आणि कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून ओळख असलेल्या इक्बाल सिंग चहल यांचा सेवाकाल ३१ जानेवारी २०२६ रोजी संपत असला, तरी त्यांची प्रशासनातील भूमिका इथून पुढेही संपणारी नाही. निवृत्तीनंतर लगेचच राज्य शासनाने त्यांच्याकडे एक अत्यंत महत्त्वाची आणि दीर्घकालीन जबाबदारी सोपवली आहे.

डॉ. इक्बाल सिंह चहल यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत. त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अप्पर सचिव म्हणून काम पाहिले. त्यानंतर २२ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांची गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या पदावर कार्यरत असतानाच ते ३१ जानेवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चहल यांना मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदावरून हटवण्यात आले होते. त्यानंतर त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अतिरिक्त सचिव म्हणून नियुक्ती झाली. मात्र, बदलापूर येथे दोन चिमुरड्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर राज्यभरात तीव्र संताप व्यक्त झाला. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असतानाच, शासनाने त्यांची गृह विभागाच्या अप्पर मुख्य सचिवपदी नियुक्ती केली होती. तसेच तत्कालीन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून तातडीने पदभार स्वीकारण्याचे आदेशही देण्यात आले होते. याच काळात पुढील आदेश येईपर्यंत त्यांच्याकडे खनिकर्म विभागाचा अतिरिक्त कार्यभारही सोपवण्यात आला होता.

दरम्यान, चहल यांच्या निवृत्तीच्या पार्श्वभूमीवर शासनाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र शासनाने मुंबई पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांना दर्जेदार निवासी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई पोलीस गृहनिर्माण टाउनशिप प्रकल्प हाती घेतला आहे.

## बालिकेचा विनयभंग करणाऱ्यास कारावास

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २२**

एका पाच वर्षीय बालिकेचा विनयभंग केल्याचा गुन्हा सिद्ध झाल्याने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एन. ग्वालानी यांनी कृष्णा चौक, नाईक तलाव येथील विजय रामचंद्र निमजे (४२) यास पाच वर्षाचा कारावास सुनावला.

२९ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास पीडित बालिका ही घरी एकटीच हजर होती. आरोपी विजयने तिच्या अल्पवयीनपणाचा फायदा घेत तिचा हात पकडून तिला हनुमान मंदिरात नेले आणि तिचा विनयभंग केला. त्यानेतर त्याने बालिकेचा थापड मारून ही माहिती कुणालाही सांगितल्यास मारून टाकेन अशी धमकी दिली. याप्रकरणी पाचपावली पोलिसांनी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदवून विजयला अटक केली.

महिला फौजदार संध्या कोळी यांनी याप्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. न्यायालयात आरोपी विजयविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायाधीश ग्वालानी यांनी त्याला ५ वर्षाचा कारावास आणि १० हजार रुपये दंड सुनावला. आरोपीतर्फे ॲड. एम.आर. गोखले यांनी, तर सरकारतर्फे सहायक सरकारी वकील कल्पना पांडे यांनी बाजू मांडली.

## नगरसेविका सरिता म्हस्के यांच्या अपहरणाचा प्रयत्न ?



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२**

कोकण भवन येथील गटस्थापनेवेळी शिवसेनेच्या (ठाकरे) नगरसेविका सरिता म्हस्के या अनुपस्थित राहिल्याने त्या शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा रंगली. मात्र मी शिंदे गटाच्या संपर्कात नव्हते. शिंदे गटाच्या बड्या नेत्याने अपहरणाचा प्रयत्न केल्याचा आरोप म्हस्के यांनी केला. 'त्यांना हुलकावणी देत तुळजापूरला नवस फेडण्यासाठी गेले. तिथे मोबाईल चालू ( रेंज ) नसल्याने मुंबईत काय चालू होते, याची मला कल्पना नव्हती. मात्र मुंबईतील गोंधळाची माहिती मिळाल्यानंतर मी मध्यरात्री पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय मिलिंद नार्वेकर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या निवासस्थानी पोचले,' अशी माहिती म्हस्के यांनी 'लोकसत्ता'ला दिली.

मुंबईत सत्तास्थापनेसाठी कोणात्याच पक्षाकडे स्पष्ट बहुमत नाही. महायुतीत भाजपकडे ८९ तर शिवसेना (शिंदे) यांच्याकडे २९ नगरसेवकांचे बहुमत आहे. दोघांचे मिळून ११८ नगरसेवक असले तरी शिवसेना (शिंदे) महापौरपदासाठी आग्रही आहे. अन्य पक्षातील नगरसेवक खेचून आपल्या नगरसेवकांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न सर्वच महापालिकांत केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या (ठाकरे) चांदिवली येथील प्रभाग क्र. १५७ च्या नगरसेविका सरिता म्हस्के या संपर्क क्षेत्राबाहेर गेल्याने त्या शिंदे गटात गेल्याची शंका व्यक्त केली जाऊ लागली.

संपर्कात आल्यानंतर त्यांनीही शिंदे गटाच्या बड्या नेत्याने अपहरणाचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. यामुळे अंबरनाथ, कल्याण-डोंबिवली पाठोपाठ मुंबई महापालिकेतही नगरसेवक फोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याच्या चर्चांना बळ मिळाले.




युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा
जिल्हा
शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६

## जिल्हा सामान्य रुग्णालय आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरीत

**भंडारा :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील भंडारा जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, भंडारा यांचेकडे हस्तांतरीत होत आहे. तसे अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविदयालय श्रीमती दुधगावकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळवले आहे. नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, येथे सध्या १०० विद्यार्थी प्रवेश व ४३० खाटा क्षमतेसह कार्यरत आहे. महाविद्यालयासाठी स्वतंत्र इमारतीचे बांधकाम अद्याप पुर्ण झालेले नसल्याने महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार नविन स्त्री रुग्णालय, व जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सुविधा तात्पुरत्या स्वरुपात महाविद्यालयाच्या वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.याच ठिकाणी वैद्यकीय शिक्षण व रुग्णसेवा सुरळीतपणे सुरु राहणार आहेत. पुढील काळात जिल्हा सामान्य रुग्णालयाचे तात्पुरत्या स्वरुपात रुपांतरण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, भंडारा मध्ये करण्यात येणार असुन येथे तृतीय स्तरीय आरोग्य सेवा उपलब्ध होईल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या तृतीय स्तरीय आरोग्य सेवांसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या नियमानुसार रुग्णशुल्क आकारण्यात येईल.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# भंडाऱ्यात रामनगर लेआउटमधील खुल्या जागेवर अतिक्रमण

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** नगर परिषद हद्दीतील खास भंडारा येथील रामनगर परिसरात मंजूर लेआउटमधील आरक्षित खुल्या जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नागरिकांनी जिल्हा प्रशासन व नगर परिषदेकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भंडारा खास येथील रामनगर लेआउट हा मा. अपर जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या आदेशानुसार १८ मार्च १९९४ रोजी मंजूर करण्यात आला होता. या लेआउटमध्ये सुमारे ३७२९.५० चौ.मी. क्षेत्रफळाची खुली जागा स्पष्टपणे दर्शविण्यात आली आहे. ही जागा नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी राखीव असून त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास मनाई आहे. मात्र लेआउट विकासक व संबंधित व्यक्तींनी

◆ वारंवार तक्रारी करूनही कारवाई नाही
◆ २५ वर्षापासून दुर्लक्ष, प्रशासनाची उदासीनता



मंजूर नकाशाचे उल्लंघन करत खुल्या जागेवर बेकायदेशीर प्लॉटिंग करून विक्री केल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, गेल्या २५ वर्षापासून ही खुली जागा अतिक्रमित अवस्थेत असून येथे सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक कार्यक्रम नियमितपणे होत आहेत. याच ठिकाणी नवसाला पावणारे माता सतवाई देवीचे मंदिर असून नवरात्रोत्सव व इतर धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.

नागरिकांचा आरोप आहे की, खुल्या जागेवर अतिक्रमण करून आरसीसी बांधकाम करण्याचा प्रयत्न सुरू असून, त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेवर गदा येत आहे. या संदर्भात रामनगर सुधार समिती व स्थानिक रहिवाशांनी नगर परिषद, मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

नियमांनुसार नगर परिषद कार्यालयाकडून संबंधितांना तीन दिवसांची नोटीस देण्यात आली असून आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र कागदपत्रे सादर होऊनही अतिक्रमण हटविण्याची प्रभावी कारवाई अद्याप करण्यात आलेली नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

या प्रकरणामुळे भंडारा शहरात 'बिल्डर लॉबीसमोर प्रशासन नमते का घेत आहे?' असा प्रश्न उपस्थित होत असून, खुल्या जागेवर होणाऱ्या अतिक्रमणाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

न्याय मिळावा यासाठी आणि प्रशासनावर दबाव येण्यासाठी ही बाब प्रसारमाध्यमांतून जनतेसमोर मांडण्यात यावी, अशी मागणी रामनगर परिसरातील रहिवाशांनी केली आहे.

## आ. परिणय फुके यांच्या अध्यक्षतेखाली गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजनेबाबत उद्या कार्यशाळेचे आयोजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार योजना तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजना या शेतकरी हिताच्या व जलसंधारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ११.०० वाजता जिल्हा नियोजन समिती, भंडारा येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळा विधान परिषदेचे आमदार डॉ. परिणय फुके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.



या कार्यशाळेसाठी भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक/सचिव तसेच अशासकीय संस्था यांना विशेषतः उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यशाळेमध्ये तलाव व धरणांतील गाळ काढण्याची प्रक्रिया, तो गाळ शेतकऱ्यांच्या शिवारात टाकण्याचे फायदे तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरणातून शेती व पाणी व्यवस्थापन कसे अधिक सक्षम होऊ शकते याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.या योजनांच्या माध्यमातून शेतीसाठी आवश्यक असलेली सुपीक माती उपलब्ध होऊन पिकांची गुणवत्ता व उत्पादन वाढीस मदत होते. तसेच जलसाठवण क्षमतेत वाढ होऊन पावसाचे पाणी वाया न जाता भूजल पातळी सुधारण्यास मोठा हातभार लागतो. परिणामी भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता या योजनांमध्ये आहे.

## आजपासून डॉ.अनिल नितनवरे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** विदर्भ साहित्य संघ शाखा भंडारा,सार्वजनिक वाचनालय भंडारा व युगसंवाद वाङ्मयीन-सांस्कृतिक संस्था भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने २३ व २४ जानेवारीला डॉ. अनिल नितनवरे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

२३ जानेवारी शुक्रवारला 'गेल्या दोन दशकातील आदिवासी समुहाची शैक्षणिक आणि सांस्कृतिक स्थिती आणि आव्हाने' या विषयावर चंद्रपूरचे युवा सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोईनकर पहिले पुष्प गुंफतील. व्याख्यानमालेचे उद्घाटन जे.एम पटेल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रदीप मेश्राम यांच्या हस्ते करण्यात येईल. अध्यक्षस्थानी डॉ. रेणुकादास उबाळे हे राहतील. प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल, वि.सा.संघ भंडाराचे अध्यक्ष डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे उपस्थित राहतील.२४ जानेवारी शनिवारला गीतकार जॉ निसार अख्तर यांच्यावर आधारित 'यादो की परछाईयॉं' हा कार्यक्रम सादर केला जाईल.या कार्यक्रमाचे उद्घाटन पवनी न.प.चे मुख्याधिकारी निलेश इंगोले हे करतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवी अमृत बन्सोड राहतील.या कार्यक्रमाचे सादरीकरण कलावंत विवेक कापगते, प्रमोदकुमार अणेराव, विणा डोंगरवार, डॉ. राहुल भोरे, डॉ.श्वेता वेगड, मोहन मिरासे, डॉ. सिद्धार्थ रंगारी हे करतील. सार्वजनिक वाचनालय भंडाराच्या इंद्रराज सभागृहात २३ व २४ जानेवारीला संध्याकाळी ६.०० वाजता आयोजित या कार्यक्रमाला भंडारा जिल्ह्यातील रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाह प्रा.सुमंत देशपांडे, प्रा.नरेश आंबिलकर यांनी केले आहे.

## सदानंद धकाते यांचे निधन



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** येथील रहिवासी सदानंद शामराव धकाते यांचे आज दिनांक २२ जानेवारी २०२६ ला पहाटे ५.१३ वा. दरम्यान वयाच्या ६९ व्या वर्षी दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांची अंतीमयात्रा राहते घरून इंदिरा गांधी वार्ड कुंभार टोली भंडारा येथून दु. २.३० वा काढण्यात आली व कारधा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या मृत्यूपश्चात पत्नी, मुलगी, जवाई, ३ बहिणी २ भाऊ व बराच मोठा धकाते परिवार आहे.

## आजपासून बिड येथे इनामी बैलांचा शंकरपट

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** तालुक्यातील बिड/सितेपार येथे आज शुक्रवार दि. २३ जानेवारीपासून ते रविवार दि. २५ जानेवारी २०२६ पर्यंत समस्त ग्रामवासियांच्या वतीने तीन दिवशीय भव्य इनामी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्कृष्ठ बैलजोड्यांना प्रथम बक्षिस ३१,१११ रुपये, द्वितीय बक्षिस २१,१११ रुपये, तृतिय बक्षिस ११,१११ रुपये, चतुर्थ बक्षिस ७,१११ रुपये तसेच इतर बक्षिससुद्धा देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रात्रीला नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.

शंकरपटाचे उद्घाटन आमदार राजु कारेमोरे यांच्या हस्ते केले जाणार आहे. अध्यक्षस्थानी जि.प. अध्यक्षा कविता उईके राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. उपाध्यक्ष एकनाथ फेंडर, आरोग्य सभापती आनंद मलेवार, पं.स. सदस्या विस्मा सेलोकर, सरपंच अल्का गौरी, उपसरपंच विक्की गायधने तसेच ग्रा.प. चे सर्व सदस्यगण, सातोनाचे सरपंच राजेश हटवार, माजी सरपंच देविदास बांते, माजी सरपंच विलास झिंगरे, तुळसा लांबट, संदिप रंगारी, पो.पा. संतोष बालपांडे, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहतील. तरी परीसरातील कास्तकार बांधवानी या इनामी शंकरपटात जास्तीत जास्त बैलजोड्या हाकलून भरघोष बक्षिसे जिंकण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भंडारा जिल्ह्यात 'रस्ता सुरक्षा रथा' द्वारे जनजागृती

■ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा उपक्रम

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय (फळड), भंडारा यांच्या वतीने 'रस्ता सुरक्षा रथा' चे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. सतीश जाधव यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

रस्ते अपघातांची प्रमुख कारणे असलेल्या वेगमर्यादा ओलांडणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर न करणे याबाबत नागरिकांना सजग करण्यासाठी या रथाच्या माध्यमातून दृकश्राव्य स्वरूपात माहिती देण्यात येणार आहे. हा रस्ता सुरक्षा रथ भंडारा जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, मुख्य बाजारपेठा तसेच



गर्दीच्या ठिकाणी जाऊन जनजागृती करणार आहे.

उद्घाटनप्रसंगी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक जितेंद्र बोरकर उपस्थित होते. यावेळी मोटार वाहन निरीक्षक सुहास ठोंबरे, श्री. अमरसिंह चौथे तसेच सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सागर सराफ, गुलशनकुमार चावरे, अनिल ढोले, श्रीमती मेघाराणी काशिद यांच्यासह उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचारी व वाहतूक पोलीस विभागाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. सतीश जाधव यांनी 'रस्ते सुरक्षा - जीवन रक्षा हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करून स्वतःचे व आपल्या कुटुंबाचे जीवन सुरक्षित ठेवावे,' असे आवाहन केले.

## प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांना शामरावबापू कापगते स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**लाखनी :** शा. बा. कापगते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, साकोलीझसेंदूरवाफा व शामरावबापू कापगते स्मृती प्रतिष्ठान, साकोली यांच्या संयुक्त विद्यमाने श्रद्धेय शामरावबापू कापगते यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध क्षेत्रातील कर्मयोगी मान्यवरांचा भव्य पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शामरावबापू कापगते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेंदूरवाफा (ता. साकोली, जि. भंडारा) येथे संपन्न होणार आहे.

या सोहळ्यात समर्थ महाविद्यालय, लाखनी येथील प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांना त्यांच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्यासाठी, विद्यार्थीकेंद्री अध्यापन पद्धतीसाठी तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल शामरावबापू कापगते स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकाससाठी त्यांनी राबवलेल्या उपक्रमांमुळे तसेच शिक्षणाच्या माध्यमातून समाजघडणीचे कार्य केल्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी अरविंद (राजू) वसंतराव हजारे (उमरेड), संघचालक हे प्रमुख



पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच खासदार डॉ. प्रशांत पडोळे, माजी खासदार सुनील मेंढे, विधान परिषद सदस्य परिणय फुके, आमदार नानाभाऊ पटोले यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या वेळी जीवनगौरव राष्ट्रसेवा पुरस्कार, मातोश्री महिला पुरस्कार तसेच पत्रकारिता, शेती, वैद्यकीय सेवा, साहित्य, शिक्षक, युवा, श्रमिक, उद्योग, दिव्यांग व कृषी उद्योग अशा विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. समाजासाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शामरावबापू कापगते स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजकांनी केले आहे.

## कंट्रोलर बॉक्स चोरीला लोटले ७ महिने

**पालांदूर :** शेतकऱ्यांना वरदान ठरल्याचे सांगून शासन शेतीपंपाकरिता सौरऊर्जा बंधनकारक केली आहे. मात्र बसविल्यानंतरच्या सौरपंप समस्यांना ७ महिने उलटूनही न्याय न मिळाल्याने शेतकऱ्याचे सिंचन रखडले आहे. शेतात लावलेल्या सौरपंपाचे कंट्रोलर बॉक्स चोरीला गेले. पीडित शेतकऱ्यांनी कंपनीच्या सूचनेनुसार सर्व प्रक्रिया करून सुद्धा कंपनी व बीज विभाग शेतकऱ्याला न्याय देण्यात अपुरी पडली आहे.

शासन व वीज विभागाच्या मध्यस्थीने शेतकऱ्याला सौरऊर्जा योजना बंधनकारक केली आहे. यात शेतकऱ्याला वर्षभर नियमित सेवा मिळण्याकरिता कंपनी साहित्याचा विमा काढतो. त्यातून तीन महिन्यात साहित्य चोरीला जाणे किंवा काही बिघाड आल्यास त्याची भरपाई करून देणे कंपनीला करारानुसार बंधनकारक असते. मात्र ७ महिने लोटून सुद्धा ओसवाल कंपनीने कंट्रोल बॉक्स पुरविला नाही. हेमंतकुमार यशवंत सेलोकर खुनारी असे प्रभावित शेतकऱ्याचे नाव आहे.

## जिल्ह्यात अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

**भंडारा:** जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमियाया अनुवांशिक आजाराविषयी जनजागृती वाढविणे तसेच वेळेत तपासणी व उपचार सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या संयुक्त पुढाकारातून हे अभियान प्रभावीपणे सुरू असून ग्रामीण व आदिवासी भागांवर विशेष भर देण्यात आला आहे.या अभियानांतर्गत शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, गर्भवती महिला तसेच ० ते ४० वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यात येत आहे. विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व गावपातळीवर आरोग्य शिबिरे आयोजित करून मोफत तपासणी, समुपदेशन व आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. सिकलसेल ॲनिमिया हा आजार वेळेवर निदान झाल्यास त्याचे दुष्परिणाम टाळता येतात, यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून घरोघरी जनजागृती केली जात आहे. आजाराची लक्षणे, प्रतिबंधक उपाययोजना व उपचार पद्धती याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती दिली जात आहे.सावन कुमार जिल्हाधिकारी भंडारा यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा व तपासणी करून घ्यावी. सिकलसेलमुक्त भंडारा जिल्हा घडविण्याच्या दिशेने अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान हे एक महत्त्वाचे पाऊल ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

# सुसंस्कारीत पिढीच्या निर्मितीची आज गरज - नगराध्यक्षा देवश्री कापगते

## स्व. मार्तंडराव कापगते पाटील स्मृती व पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रतिपादन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** आपल्या वाट्याला आलेले कोणतेही काम वाईट नाही, आपण ते निष्ठेने केले पाहिजे. एक ना एक दिवस आपल्या कामाची कदर होतेच. विद्यार्थ्यांनी खूप मेहनतीने अभ्यास करून पुढे गेले पाहिजे. व्यसनाधिनतेकडे वळता कामा नये. पालकांनी देखील आपल्या पाल्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी निव्वळ आपण शिक्षकांवरच अवलंबून राहू नये आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शाळा महाविद्यालयांतून तसेच स्व. मार्तंडराव कापगते स्मृती सोहळ्यांसारख्या या कार्यक्रमांतून सुसंस्कारीत पिढी घडली पाहिजे असे प्रतिपादन साकोली सेंदूरवाफा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा देवश्री मनिष कापगते यांनी ( गुरूवार २२ जानेवारी ) ला बोदरा येथे केले.

भूतपूर्व आमदार स्व. मार्तंडराव कापगते पाटील स्मृती प्रतिष्ठान साकोली वतीने बोदरा येथे रामाजी कापगते विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात स्मृती सोहळा संपन्न झाला. यावेळी विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह असे या सत्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमात अध्यक्ष नगराध्यक्षा देवश्री कापगते, उदघाटक जि. प. स. अविनाश ब्राम्हणकर, अतिथी जि. प. स. वनिता डोये, सरपंचा उषा डोंगरवार, माजी पं. स. स. छाया पटले, बोदरा सरपंचा ललिता कापगते, नगरसेवक विवेक बैरागी, प्रिती डोंगरवार, नयन पटेल, संस्थेचे अध्यक्ष जासवंत कापगते, कृ. उ. बा. स. लाखनी अध्यक्ष प्रेमराज गहाणे, मातोश्री यशोदाबाई मार्तंडराव कापगते, सचिव होमराज कापगते आदी मान्यवर उपस्थित होते.

यात शेतकरी पुरस्कार सरिता फुंडे, ज्येष्ठ नागरिक पुरस्कार पतीराम कापगते, आनंदराव चिचामे, वासुदेव वाडीभस्मे, शेखर निर्वाण यांना तर शिक्षक पुरस्कार नरेंद्र चौधरी यांना प्रदान करण्यात आला. आदर्श सरपंच पुरस्कार खैरी वलमाझरी येथील सरपंच पुरूषोत्तम रूखमोडे तर स्व. मंदाताई कापगते स्मृती पुरस्कार पुष्पा राजेश कापगते यांना प्रदान करण्यात आला. याचवेळी संस्थेअंतर्गत संचालित दोन्ही शाळेतील दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षेतून प्रथम आलेल्या आर्या कापगते, जयेश कामथे, तुषार गिऱ्हेपुंजे, सलोनी चचाने, प्राजक्ता येसनसुरे या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

प्रसंगी अविनाश ब्राम्हणकर यांनी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकातून प्रतिष्ठानचे सचिव व सोहळ्याचे आयोजक होमराज कापगते यांनी पद किंवा प्रतिष्ठा महत्वाची नसते. राजकारण स्वार्थाने बरबटलेले आहे त्यामुळे समाजकारण महत्वाचे असते. आपल्याला पैशांपेक्षा माणसे कमविण्यात आनंद आहे. हा सोहळा सर्वांच्या सहकार्यातुन उत्तम रितीने साजरा झाला त्यामुळे मी सर्वांचा कायम ऋणी राहीन असे प्रतिपादन केले. सदर सोहळ्याला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. संचालन संयोजक व प्राचार्या अर्चना बावणे व रूपेश कापगते यांनी तर आभार प्रदर्शन सहसराम बन्सोड यांनी केले. यशस्वीतेसाठी स्व. मार्तंडराव पाटील कापगते स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश सूर्यवंशी, प्राचार्य रामकृष्ण लंजे, शारदा कोलटेके, सलाम कुरैशी, सुशील कापगते, प्रा. एल. बी. पारधीकर, सुदाम हटवार व तसेच सर्व सदस्य यांनी सहकार्य केले.

# नप.शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा देण्याचा प्रयत्न - पालकमंत्री डॉ.भोयर

## कमला नेहरू हायस्कूल येथे ई-वाचनालयाचे लोकार्पण



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. २२**

नगर परिषद शाळांमध्ये सर्वसामान्य गरीब घरातील मुले शिक्षण घेतात. त्यामुळे शहरातील या शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना चांगले अध्यापन आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

रामनगर येथील वर्धा नगरपरिषदेच्या कमला नेहरु हायस्कूल मध्ये उभारण्यात आलेल्या वातानुकूलित ई-वाचनालयाचे लोकार्पण पालकमंत्री डॉ.भोयर यांच्याहस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, मुख्याधिकारी विजय देशमुख, नगर परिषद सभापती प्रियंका खंगार, राखी पांडे, स्नेहा आखरे, शुभांगी कोलते, नगरसेविका वंदना भुते, विलास आगे, सतिश मिसाळ, मेघना मले, स्वाती गव्हाणे, उज्वला पेठे, शाळेच्या मुख्याध्यापिका मैथिली मुळे आदी उपस्थित होते. शहरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका तसेच वाचनाच्या चांगल्या सुविधा देण्यासाठी आपण आठ ठिकाणी वातानुकूलीत ई-वाचनालये उभे करतो आहे. त्यापैकी दोन याधीच सुरु झाले आहे. उर्वरीत वाचनालयांचे काम सुरु आहे. ते देखील लवकरच सुरु होतील. पुर्वी नगरपरिषदेची कमला नेहरू ही शाळा शहरातील नामांकित शाळा होती. इंग्रजी खाजगी शाळांमुळे अशा अनेक शाळा दुर्लक्षित झाल्या आहे. या शाळांना पुन्हा नावलौकिक मिळवून देण्याचा माझा प्रयत्न आहे. वर्धा शहरात असलेल्या नगरपरिषद शाळांच्या आधुनिकीकरणासाठी नगरपरिषदेने आराखडा तयार करावा. यासाठी जिल्हा नियोजन समिती आणि राज्यस्तरावरून निधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करू. वर्धा शहरातील विद्यार्थ्यांसह नागरिकांकरीता नगरपरिषदेला सोबत घेऊन काम करणार असल्याचे पालकमंत्री डॉ.भोयर पुढे बोलतांना म्हणाले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना नगराध्यक्ष सुधीर पांगुळ म्हणाले, शहरातील नगरपरिषद शाळांची गुणवत्ता सुधारणे आवश्यक आहे. डॉ.पंकज भोयर हे जिल्ह्याचे पालक आहे. नगरपरिषदेचे पालकत्व देखील त्यांनी स्वीकारावे आणि शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी मदत करावे. लोककल्याणासाठी नगरपरिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन कामे करणार असल्याचे पांगुळ म्हणाले.

### शहरात निर्माण होत आहे ८ वातानुकूलीत ई-वाचनालये

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी विजय देशमुख यांनी केले. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी शहरासाठी ८ ई-वाचनालये मंजूर केले. त्यापैकी ६ वाचनालयाचे बांधकाम पुर्ण झाले आहे. त्यातील दोन वाचनालये सुरु झाले. कमला नेहरू विद्यालयातील मोठे वाचनालय असून शहरात एक चांगले शैक्षणिक वातावरण यामुळे निर्माण होतील, असे सांगितले. सुरुवातीस पालकमंत्री व मान्यवरांनी ई-वाचनालयाच्या नामफलकाचे अनावरण तसेच फित कापून वाचनालयाच्या कक्षाचे लोकार्पण केले. वाचनालयाची पाहणी देखील यावेळी त्यांनी केली. कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी , दि. २२**

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर जि.प.प्राथमिक शाळा, पिंपळा (पु), ता.आर्वी, जि.वर्धा येथे आयोजित करण्यात आला आहे. या निवासी शिबिराचे उद्घाटन ध्वजारोहण करुन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के उपस्थित होते. तर उद्घाटक म्हणून पिंपळा (पु) येथील सरपंच राजकुमार मनोरे उपस्थित होते. प्रमुख अतिथी माजी प्राचार्य डॉ.हरिभाऊ वेरुळकर,उपसरपंच वैशाली दहिवळे, सन्मानित ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित गावकरी नागरिक आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना सरपंच राजकुमार मनोरे यांनी शिबिरार्थींनी शिबिराच्या दिवसांमध्ये काय करायला पाहिजे, काय नको, गावकऱ्यांशी कशा प्रकारे सुसंवाद प्रस्थापित करायला पाहिजे.या संदर्भात मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक सुधीर टरके यांनी आपल्या प्राथमिक शाळेतील उपक्रमा संदर्भात माहिती दिली.पोलीस पाटील नम्रता बनकर यांनी शिबीरार्थींना गावकऱ्यांकडून सहकार्य राहील असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ.हरिभाऊ वेरुळकर यांनी पर्यावरण जागृती विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुस्तकी ज्ञानासोबतच आपण सामाजिक भान ठेऊन येथे शिकणाऱ्या गोष्टी आचरणात आणाव्या व विद्यार्थ्यांनी या निवासी शिबिरातून शिकून स्वतःमध्ये बदल घडवावे कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.रविंद्र सोनटक्के यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष पेठे यांनी केले. रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.जयेश पांडे, डॉ.रोहिणी मेश्राम, प्रा.अमर भोगे, प्रा.रोशन परतेती व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील समन्वयक डॉ.विजय खडसे, ग्रा.पं.सदस्य रुपाली लोहे, वंदना बडगे,मंदा उइके,दिनेश लोहे ,निता रामटेके शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,नम्रता बनकर (पोलीस पाटील),भुरे अंगणवाडी सेविका, दिनेश धजेकर ग्रामविकास अधिकारी गावातील नागरिक व शिबीरार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.दर्शनकुमार चांभारे यांनी केले तर आभार प्रा.अमर भोगे यांनी मानले.

### जुन्या वादातून युवकास बदडले

**समुद्रपूर, :** जुन्या वादाचा वचपा काढत दोघांनी युवकाच्या घरात जात त्यास काठीने मारहाण करुन साहित्याची तोडफोड केली, ही घटना डोंगरगाव येथे घडली, आकाशकैलासगिरडे यांचा रामसुनील भटकर आणि सचिन प्रभाकर लेहकरे यांच्यासोबत आठ दिवसांपूर्वी वाद झाला होता, वादाचा वचपा काढत दोघांनी आकाशच्या घरी जात त्यास मारहाण केली, तसेच घरातील साहित्याची तोडफोड केली.

## बसमधुन चोरट्याने प्रवाश्याच्या खिशातील ४६ हजार रुपयांची केली चोरी

### आरोपी अवघ्या दोन तासात पोलिसांच्या ताब्यात



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा घा.दि. २२**

तळेगाव बस स्टॉप येथून बसमध्ये प्रवास करीत असलेल्या प्रवाशी इसमाच्या खिशातील ४६ हजार रु अज्ञात चोरट्याने चोरी केली. याप्रकरणी पो.स्टे.ला तक्रार दाखल केली असता पोलिसांनी अवघ्या दोन तासात आरोपीला ताब्यात घेतले.

पो.स्टे.कारंजा(घा) येथे नरेंद्र राजारामजी मोटघरे यांनी तक्रार दिली की, तळेगाव बस स्टॉप येथून बसमध्ये बसून कारंजा ला येत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे खिशातील ४६हजार रुपये काढून घेतले. अशी पोलीस स्टेशनला तक्रार दिल्याने त्यांची तक्रारीवरून गुन्हा नोंद करून ठाणेदार प्रल्हाद मदन यांनी तात्काळ तपास पथक तयार करून आरोपीस अवघ्या दोन तासात अटक केली.

चोरीस गेलेले ४६हजार रुपये जप्त करून पुढील तपास चालू आहे ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांचे मार्गदर्शनात सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद मदन, पोलीस उपनिरीक्षक सतीश जायभाय, निलेश मंडारी,दिनेश घसाड, आशिष कालोकार, अमोल मानमोडे, समाधान पांडे यांनी केली.

### मालवाहूला धडक, एक ठार

**वर्धा, :** टिप्पर चालकाने मालवाहूला जबर धडक दिली, यात मालवाहू वाहनात बसून असलेल्या एकाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला, हा अपघात वडनेर ते सिरसगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर झाला, दिवाकर रामाजी वांदिले (४० रा. अल्लीपूर) असे मृतकाचे नाव आहे, तर हिमांशू कैलास हुल्के (२४ रा. अल्लीपूर) असे जखमीचे नाव आहे, हिमांशू एम. एच. ४८ एवाय. ८०५४ क्रमांकाच्या मालवाहूने वडनेर वरुन अल्लीपूरला परत जात होते, दरम्यान, टिप्पर चालक प्रशांत सुरेश हिवरकर रा. सोनेगाव स्टेशन याने ताब्यातील टिप्पर निष्काळजीपणे चालवून मालवाहूला धडक दिली, यात हिमांशूच्या बाजूला बसलेल्या दिवाकर केबीनमध्ये फसल्याने त्याचा मृत्यू झाला.

## निधन वार्ता

### कुसुम येळणे



**सिंदी(रे). :** विनोबा वार्ड येथील रहिवासी कुसुम यशवंत येळणे( ८५ )यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई, स्नुषा, नातवंडे असा आप्तपरिवार आहे. अशोक कलोडे यांच्या त्या भगिणी होत.

### मिलिंद बेलखोडे



**सिंदी(रे) :** येथील राष्ट्रीय काँगेस चे सक्रीय सदस्य मिलिंद बेलखोडे यांचे निधन झाले. त्यांनी अंत्यायात्रा दि.२३ रोजी त्यांच्या निवासस्थानातून निघेल.

# प्रभाग क्र.७ वरील रस्त्याचे बांधकाम त्वरीत करण्यात यावे

## नागरिकांची नपवर धडक,नगराध्यक्षांना निवेदन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. २२**

प्रभाग ७ मधील घुगुसकर गॅरेज ते पावडे चौक, पावडे चौक ते धंतोली चौक,धंतोली चौक ते मेन रोड हा रस्ता पूर्णपणे उखडलेला असुन रस्त्याचे त्वरित बांधकाम करण्यात यावे, या मागणीसाठी नगरसेविका श्वेता पाठक यांच्या नेतृत्वात नागरिकांचा नगरपालिकेवर धडक मोर्चा काढून नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांना निवेदन देण्यात आले

या मार्गावर अनेक शाळा, महाविद्यालय, रुग्णालय,असून अति रहादारीचा रस्ता आहे.या रस्त्यावरून अनेक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात ये जा करत असतात. रस्त्याची ही दयनीय अवस्था असल्यामुळे येथून वाहने जाणेही कठीण होते. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी, शेतमालाची वाहतूक करण्यासाठी, आणि आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थितीत अडथळे निर्माण होतात.रस्त्याची दुरुस्ती झाल्यास नागरिकांना ये-जा करण्याची अडचण भासणार नाही, परिणामी रस्त्याची त्वरीत बांधकाम करण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.२४ डिसेंबररोजी नगरसेविका श्वेता पाठक यांनी या संदर्भात निवेदन दिले होते.या निवेदनाची कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही किंवा नगरपालिकेकडून कोणती कोणतेही ठोस आश्वासन मिळाले नाही. लेखी निवेदनाला केळाची टोपली प्रशासनाने दाखवली असे समजण्यात हरकत नाही प्रशासनाने शेवटी रस्त्यावर उतरायची वेळ आणली आहे.या गंभीर समस्येची दखल घेऊन तातडीने नवीन रस्त्याच्या कामास मंजुरी द्यावी किंवा असलेल्या रस्त्यातील अडथळे दूर करून रस्ता उपलब्ध करून द्यावा. येणाऱ्या १ फेब्रुवारी पर्यंत जर अर्जाची दखल घेतली नाही किंवा आपल्या मार्फत कोणतेही ठोस पाऊल उचलल्या गेले नाही तर प्रभागातील नागरिक रस्ता रोको आंदोलनाची भूमिका घेऊ असे नगरसेविका श्वेता पाठक यांनी इशारा दिला आहे. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ व मुख्याधिकारी नगरपरिषद वर्धा यांना निवेदन देण्यात आले.मुख्याधिकारी यांनी येत्या २८ तारखेपर्यंत प्रस्ताव पाठवून निधीबद्दल मागणी करण्यात येईल व त्वरित लेखी स्वरूपात काय कारवाई करणार याचं पत्र नगरसेवकांना देण्यात येईल असे आश्वासित केले. यावेळी नगरसेवक शैलेश मुन्ना झाडे, समीर देशमुख,माजी नगरसेवक वरुण पाठक,नगरसेवक सोनू ठाकुर, नीरज त्रिपाठी, विलास अष्टेकर,विनय डहाके, मोहन इंगोले, उदय चंदाराना, शब्बीर शेख, श्याम लंगडे,सुरेश सलामे, प्रणिता कावळे, सविता अष्टेकर, पराग अवजेकर, निखिल पाठक वसमस्त नागरिक उपस्थित होते.

# हुतात्मा राष्ट्रीय विद्यालयात कला-क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी( श), दि. २२**

शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या जिल्ह्यातील नामांकित हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात दि. २३ ते ३० जानेवारी या कालावधीत 'वार्षिक कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त प्रबोधनपर रॅलींचे आयोजन केले जाणार आहे.

शहरातील जि.प. शाळा, महाविद्यालय व हुतात्मा शैक्षणिक परिवारातील सर्व शाळा यामधील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याचा प्रयत्न याद्वारे केला जाणार आहे. कला - क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन २३ जानेवारला सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सचिव विनायक होले उपस्थित राहतील. यावेळी हुतात्मा स्मारक समितीचे सर्व नवनिर्वाचित विद्यमान उपाध्यक्ष डॉ किशोर गंजीवाले, सहसचिव भरत वणझारा,कोषाध्यक्ष शंकर नागपुरे, सदस्य राजाभाऊ सव्वालाखे व अर्पित मालपे उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटनानंतर दोन्ही संघांमधील 'दर्शनी कबड्डी' सामन्याने खेळांना सुरुवात होईल. २४ जानेवारी रोजी सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कबड्डी, लंगडी, व्हॉलीबॉल, वैयक्तिक खेळात स्लो सायकलिंग, गोळाफेक, उंच उडी,लांब उडी, भाला फेक,धावणे (रनिंग स्पर्धा).रांगोळी स्पर्धा आणि संगीत खुर्ची तसेच २५ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विशेष रांगोळी स्पर्धा व मतदार जागृती रॅलीचे आयोजन २६ रोजी सकाळी ७:१५ मिनिटांनी ध्वजारोहण होईल. ध्वजारोहण आष्टी तालुक्यात द्वितीय क्रमांक व हुतात्मा राष्ट्रीय कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या संस्कार सोनोने या विद्यार्थ्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी ११:३० वाजल्यापासून सती मैदान येथे विद्यालयाचे एन. सी.सी.,स्काऊट गाईड,कप बुलबुल, हरित सेना पथकाद्वारे पथसंचलन केले जाईल.या पथसंचनात तहसीलदार ऐश्वर्या गिरी, नगराध्यक्ष अनिल धोत्रे,गट शिक्षणाधिकारी पद्मा तायडे, ठाणेदार राजेश जोशी यांच्या सह संपूर्ण हुतात्मा स्मारक समितीचे पदाधिकारी यांना मानवंदना देण्यात येईल.त्यानंतर आष्टी शहरातील सर्व जिल्हा परिषद शाळा व सोबतच हुतात्मा शैक्षणिक परिवारातील शाळा यामधील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातील.२७ जानेवारीला सकाळी ११ ते ४ या वेळेत हुतात्मा शैक्षणिक परिवारातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच उर्वरित क्रीडा स्पर्धा २८व २९ जानेवारीला पार पडतील.या महोत्सवाची सांगता ३० जानेवारीला हुतात्मा दिनी होईल. सकाळी ११ वाजता विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून पारितोषिकाचे वितरण केले जाईल. दुपारी ३:३० वाजता जुना बस स्टँड आष्टी येथील शहीद स्मारकाजवळ भजन संध्या व सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून या आठवडाभर चालणाऱ्या कला-क्रीडा सप्ताहाचा समारोप होईल.या कला क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मुख्याध्यापक पुंडलिक नागतोडे यांनी केले.

## वृद्ध दाम्पत्यास काठीने मारहाण

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट,दि. २२**

माझ्या बहिणीला तुझ्या मुलाने का मारले ? असे म्हणत युवकाने वयोवृद्ध दाम्पत्याला काठीने मारले, ही घटना वणी लहान गावात घडली, नलुबाई मुंगल व त्यांचे पती नामदेव हे घरी असताना सचिन भोयर रा. टेमुर्डा, जि. चंद्रपूर हा आला आणि जोरजोरात शिवीगाळ करु लागला, त्याला हटकले असता त्याने नलुबाईच्या पायावर व पाठीवर काठी मारली, वाद सोडवण्यासाठी नामदेव गेला असता त्यांनाही मारहाण करत जखमी केले, याप्रकरणी हिंगणघाट पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

## अखेर हिंगणघाट तालुक्यातील ९७ गावात प्रकाश

### वीज वितरण कंपनीने सुरू केला खंडित पुरवठा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वडनेर,दि. २२**

हिंगणघाट तालुक्यातील ग्रामपंचायत ने वीज वितरण कंपनीचे वीज देयक अनेक वर्षापासून न भरल्यामुळे वीज वितरण कंपनीने ९७ गावांचा वीजपुरवठा दोन दिवसापूर्वी खंडित केला होता. याची दखल घेत काही ग्रामपंचायतीने थकीत देयक भरल्यामुळे वीज पुरवठा सुरू करण्यात आला.

मागील तीन दिवसापासून ग्रामीण भागात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. प्रशासकीय अधिकाऱ्यांसह संबंधित ग्रामपंचायतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते

त्यामुळे ९७ ग्रामपंचायतीमध्ये बहुतांश ग्रामपंचायतने २१ जानेवारी रोजी पर्यंत थकीत असलेले वीज देयक काही प्रमाणात भरल्याने संपूर्ण तालुक्यातील ९७ गावचा वीजपुरवठा सुरू करण्यात आल्या असल्याची माहिती वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. हिंगणघाट तालुक्यातील पोहना वीज वितरण कंपनी अंतर्गत येत असलेल्या २९ गावांचा वीज पुरवठा खंडित केला होता.वडनेर २७,अल्लीपूर २०, कानगाव २२, हिंगणघाट ग्रामीण ५० अश्या ९७ गावांचा यात समावेश होता,

मात्र शेवटी ग्रामपंचायतला अंधाराची सवय नसल्याने तडजोड करून वीज वितरण कंपनीचे थकीत असलेले देयक काही प्रमाणात भरले असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता सोरटे यांच्याकडून मिळाली आहे. त्यामुळे तालुक्यातील ९७ गावाचा वीज पुरवठा पूर्वरत सुरू करण्यात आला आहे.

